MHDH040008082022

<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्र.१८३/२०२२</u>

<u>सईदाबी नजीर शेख व इतर वि.निरंक</u>

## <u>निशाणी क्र.१ खालील आदेश</u>

अर्जदार यांनी कायदेशीर वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

२. अर्जदाराचे थोडक्यात कथन की, अर्जदार हे मौजे दोंडाईचा, ता. शिंदखेडा जि. धुळे येथील रहिवासी असुन मयत शेख नजीर शेख बशीर हे अर्जदार क्र. १ हिचे पती व अर्जदार क्र. २ व ३ यांचे वडील होते. शेख नजीर शेख बशीर हे दिनांक १४.०४.२०२१ रोजी मौजे दोंडाईचा येथे मयत झालेले आहेत. तसेच मयताची आई नामे हनीफा शेख बशीर व मयताचे वडील नामे शेख बशीर शेख छोटु हे देखील बऱ्याच वर्षांपुर्वी मयत झालेले आहेत. मयत शेख नजीर शेख बशीर यांना त्यांच्या मृत्युपश्चात अर्जदार पत्नी नामे सईदाबी नजीर शेख, मुले नामे शेख महेबुब शेख नजीर व शेख जाकीर शेख नजीर असे कायदेशीर वारस असुन त्यांच्या व्यतिरिक्त मयतास इतर कोणतेही कायदेशीर वारस नाहीत.

३. मयत शेख नजीर शेख बशीर यांच्या नावे मौजे दोंडाईचा ता. शिंदखेडा जि. धुळे येथे भुमापण क्र. व उपविभाग ४९/२/२७/ब क्षेत्र अकृषीक बिनशेती क्षेत्र १.१५.५० व घर मिळकत मालमत्ता क्र. ७००१९०२ क्षेत्र ५४.४१ अशा मिळकती आहेत. सदर वर नमुद मिळकतींवर मयत शेख नजीर शेख बशीर यांचे वारस म्हणुन वर नमुद अर्जदार यांचे नावे लावण्यासाठी मयतांच्या वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदार यांनी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

४. अर्जदार यांनी अर्जातील कथनाच्या सत्यतेसाठी अर्जदार क्र. ३ यांचे शपथपत्र नि.११ वर दाखल केलेले आहे. सदर शपथपत्रात अर्जदार यांनी अर्जातील कथनांचा पुनरउल्लेख केला असुन मयत शेख नजीर शेख बशीर हे अर्जदार क्र. १ हिचे पती व अर्जदार क्र. २ व ३ यांचे वडील असुन त्यांच्या मृत्युपश्चात त्यांना वर नमुद अर्जदार हे त्यांचे कायदेशीर वारस असुन त्यांच्या लाभात वारस प्रमाणपत्र देण्याची मागणी केली असुन अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे.

५.		अर्जदारांनी अर्जासोबत यादी निशाणी क्र.३ सोबत मयत शेख नजीर शेख बशीर यांच्या मृत्युदाखल्यांची पडताळणी केलेली प्रत, अर्जदार यांच्या आधारकार्डांची पडताळणी केलेल्या प्रती व मयत शेख नजीर शेख बशीर यांच्या नावे असलेल्या मौजे दोंडाईचा ता. शिंदखेडा जि. धुळे येथे भुमापण क्र. व उपविभाग ४९/२/२७/ब क्षेत्र अकृषीक बिनशेती क्षेत्र १.१५.५० व घर मिळकत मालमत्ता क्र. ७००१९०२ क्षेत्र ५४.४१ च्या मालमत्ता उताऱ्यांच्या प्रती अशी कागदपत्रे अभिलेखावर दाखल केलेले आहेत.

६.		अर्जदारांनी अर्जाच्या अनुषंगाने न्यायालयामार्फत मराठी वृत्तपत्र 'दैनीक वार्ता' यामध्ये दिनांक १०.११.२०२२ रोजीच्या अंकात जाहीर प्रगटन प्रसिध्द करण्यात आले. मात्र मुदतीत किंवा आजपर्यंत कोणीही आक्षेप नोंदविलेला नाही.

७.		वरील कागदपत्रांच्या अनुषंगाने माझे असे मत आहे की, मयत शेख नजीर शेख बशीर यांना त्यांच्या मृत्यु पश्चात वर नमुद अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे दाखल पुराव्यावरुन अर्जदारांनी मागणी केल्याप्रमाणे मयतांचे अर्जदार हे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत. त्यामुळे कायदेशीर वारस प्रमाणपत्र त्यांचे लाभात देणे न्यायोचीत होईल म्हणुन मी खालील प्रमाणे आदेश करतो.

## <u>आदेश</u>

१. अर्जदारांचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदारांच्या मागणी प्रमाणे मयत शेख नजीर शेख बशीर यांच्या नावे असलेल्या मौजे दोंडाईचा ता. शिंदखेडा जि. धुळे येथे भुमापण क्र. व उपविभाग ४९/२/२७/ब क्षेत्र अकृषीक बिनशेती क्षेत्र १.१५.५० व घर मिळकत मालमत्ता क्र. ७००१९०२ क्षेत्र ५४.४१ या मिळकतीवर नांवे लावणेकामी त्यांच्या मृत्यु पश्चात अर्जदार पत्नी नामे सईदाबी नजीर शेख, मुले नामे शेख महेबुब शेख नजीर व शेख जाकीर शेख नजीर हे कायदेशीर वारस असुन त्यांचे नावे कायदेशीर वारस प्रमाणपत्र आवश्यक ते न्यायालयीन शुल्क भरल्यानंतर जारी करण्यात यावे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by AVINASH WAMANRAO KSHIRSAGAR
Date: 2023.01.07 16:35:26 +0530

(अविनाश डब्ल्यु क्षिरसागर )

दिनांकः– ०७.०१.२०२३		दिवाणी न्यायाधीश क.स्तर, दोंडाईचा.

<u>**प्रमाणपत्र**</u>

मी प्रमाणित करितो की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकूरातील शब्द न् शब्द मूळ आदेशाप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| लघुलेखकाचे नांव | – बी.एन. थोरात |
| न्यायालयाचे नांव | – न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दोंडाईचा |
| पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक. | – ०७.०१.२०२३ |

स्वाक्षरित/–
लघुलेखक.